RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ८३

दि.२१ जुलै २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# आंदोलकांचा धुडगूस-दगडफेक, पोलिसांचा लाठीमार!

## जे. पी. नड्डा यांच्याशी शिष्टमंडळाची चर्चा, सोनम वांगचूक यांचे उपोषण सुरूच

नवी दिल्ली : दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला सोमवारी हिंसक वळण लागले. संसदेकडे कूच करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलनकर्त्यांना रोखताना संसद मार्ग, शास्त्री भवन आणि आसपासच्या परिसरात पोलिस व आंदोलनकर्त्यांमध्ये जोरदार झटापट झाली. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, आंदोलनादरम्यान झालेल्या दगडफेक आणि हिंसाचारात ५० हून अधिक पोलीस कर्मचारी जखमी झाले असून ७० पेक्षा अधिक आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. विविध ठिकाणी घडलेल्या घटनांप्रकरणी स्वतंत्र गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



सकाळपासूनच जंतर-मंतरवर हजारो आंदोलनकर्ते जमा झाले होते. दुपारच्या सुमारास संसद चलोच्या घोषणांसह आंदोलनकर्त्यांनी संसद भवनाच्या दिशेने मोर्चा वळविला. संसद परिसरात आधीच मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अनेक ठिकाणी बॅरिकेड्स उभारण्यात आले होते.

आंदोलनकर्त्यांनी बॅरिकेड्स ओलांडण्याचा प्रयत्न केल्यानंतर धक्काबुक्की झाली. त्यानंतर काही ठिकाणी पोलिसांवर दगडफेक झाल्याचा दावा पोलिसांनी केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी लाठीमार केला, तर काही ठिकाणी अश्रुधुराच्या नळकांड्यांचाही वापर करण्यात आला.

दिल्ली पोलिसांनी संध्याकाळी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात आंदोलनकर्त्यांना हिंसक कृत्यांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. तसेच समाजमाध्यमांवर फिरणाऱ्या अफवा किंवा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये किंवा ती पुढे पाठवू नये, असेही नागरिकांना सांगितले. संसद मार्ग परिसरातील आंदोलनकर्त्यांची गर्दी दाखविणारा ड्रोन व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर, तो ड्रोन विनापरवानगी उडविण्यात आल्याचा संशय व्यक्त करत पोलिसांनी त्याची चौकशी सुरू केली आहे. पोलिसांनी सांगितले की, घटनास्थळांवरील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल व्हिडिओ, डिजिटल पुरावे आणि ड्रोनशी संबंधित माहिती तपासली जात आहे. विविध ठिकाणी प्राप्त झालेल्या तक्रारींनुसार स्वतंत्र एफआयआर नोंदविण्यात येत असून, कायदा हातात घेणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

दरम्यान, आंदोलन सुरू असतानाच केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी सीजेपीच्या शिष्टमंडळाची भेट घेतली. या बैठकीनंतर सीजेपीचे प्रवक्ते आशुतोष रांका यांनी पत्रकारांना सांगितले की, शिष्टमंडळाने सरकारसमोर तीन प्रमुख मागण्या ठेवल्या. पहिली, पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांची तातडीने सुटका करून त्यांना व्हिडिओ संदेशाद्वारे जनतेशी संवाद साधण्याची परवानगी द्यावी. दुसरी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवावे किंवा त्यांचा राजीनामा स्वीकारावा. तिसरी, नीट प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणानंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची भरपाई द्यावी.

या बैठकीनंतर जे. पी. नड्डा यांनी समाजमाध्यमावरील आपल्या अधिकृत संदेशात सांगितले की, शिष्टमंडळाने मांडलेल्या मागण्या सरकारच्या वरिष्ठ नेतृत्वासमोर मांडल्या जातील आणि त्यावर चर्चा केली जाईल. तसेच आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. सरकारची भूमिका वरिष्ठ स्तरावरील चर्चेनंतरच स्पष्ट केली जाईल, असे त्यांनी नमूद केले. या आंदोलनादरम्यान जंतर-मंतरवरील मुख्य आंदोलनस्थळावरही मोठी कारवाई करण्यात आली. संध्याकाळी दिल्ली पोलिसांनी आंदोलनाचे मुख्य व्यासपीठ हटवून ते रिकामे केले. आंदोलनकर्त्यांनी याला लोकशाही आंदोलन दडपण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला, तर पोलिसांनी ही कारवाई कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असल्याचे सांगितले.

आंदोलनाचे नेते अभिजित दीपके यांनी आपले उपोषण मागे घेतले. मात्र, पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांचे उपोषण सुरूच आहे. महत्त्वाचे म्हणजे, त्यांचे उपोषण सध्या जंतर-मंतरवर नसून दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात सुरू आहे. १८ जुलै रोजी दिल्ली पोलिसांनी त्यांना जंतर-मंतरवरून हलविल्यानंतर वैद्यकीय तपासणीसाठी सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथूनच त्यांनी हस्तलिखित संदेशाद्वारे आपण उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे जाहीर केले आहे. तसेच, आपण बेकायदेशीररीत्या ताब्यात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या संपूर्ण घडामोडींचे पडसाद संसदेच्या पावसाळी अधिवेशनातही उमटले. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सोनम वांगचूक यांना जंतर-मंतरवरून हलविण्याच्या कारवाईचा मुद्दा उपस्थित केला. तसेच विद्यार्थी आंदोलन, नीट प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकरण आणि दिल्ली पोलिसांच्या कारवाईवर सरकारला लक्ष्य केले. या मुद्द्यांवर चर्चा घेण्याची मागणी करत विरोधी सदस्यांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे काही काळ दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळाचे वातावरण निर्माण झाले. संसद परिसर, नॉर्थ ब्लॉक, साऊथ ब्लॉक, शास्त्री भवन आणि केंद्रीय मंत्रालयांच्या परिसरात दिवसभर कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. अतिरिक्त निमलष्करी दल तैनात करण्यात आले होते. अनेक मार्गांवरील वाहतूक वळविण्यात आली, तर काही मेट्रो स्थानकांवर सुरक्षा वाढविण्यात आली. दिल्लीतील या आंदोलनामुळे राजधानीतील राजकीय वातावरण तापले असून, संसद अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या संघर्षाचे पडसाद पुढील काही दिवसही उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजनांसाठी २१ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**लातूर/ प्रतिनिधी:** भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कोलकाता येथील राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या समान व असमान निधी योजनेअंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता विविध योजनांचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्रभारी संचालक अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे.

समान निधी योजनेअंतर्गत इमारत बांधकाम व विस्तारासाठी २५ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जात असून, इतर योजनांचा लाभ केंद्रीय पद्धतीने दिला जात असल्याने त्याकरिता स्वतंत्र प्रस्ताव पाठवू नयेत. असमान निधी योजनेअंतर्गत ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधनसामग्री व फर्निचर खरेदीसाठी ४ लाख रुपये तर इमारत बांधकामासाठी १० ते १५ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. याशिवाय ज्ञान कोपरा विकासासाठी २.५० लाख रुपये, आधुनिकीकरणासाठी २ लाख रुपये, महोत्सवी वर्षे (५०, ६०, ७५, १००, १२५, १५० वर्षे) साजरी करण्यासाठी ६.२० लाख रुपये आणि इमारत विस्तारासाठी १० लाख रुपयांची तरतूद आहे. तसेच राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण व जागरूकता कार्यक्रमांसाठी १.५० लाख ते ३ लाख रुपयांपर्यंत आणि बाल ग्रंथालय व बालकोपरा स्थापनेसाठी ६.८० लाख रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

या योजनांचे नियम, अटी व अर्जाचा नमुना www.rrrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुकांनी कोणत्याही एकाच योजनेसाठीचा प्रस्ताव इंग्रजी किंवा हिंदी भाषेत चार प्रतीत तयार करून, आवश्यक कागदपत्रांसह आपल्या संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पोहोचेल अशा बेताने पाठवावा किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधवा.

## एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई सुरु; वाहनांच्या पुनर्नोंदणीसह सर्व कामकाज थांबविले

**लातूर/प्रतिनिधी :** १ एप्रिल, २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्याची अंतिम मुदत ३० जून, २०२६ पर्यंत देण्यात आली होती. ही मुदत संपल्यानंतर आता १ जुलै, २०२६ पासून एचएसआरपी न बसविलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई सुरु करण्यात आली आहे. अशा वाहनांचे पुनर्नोंदणीसह सर्व कामकाज थांबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती लातूरचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांनी दिली आहे. केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांना एचएसआरपी पाटी बसविणे बंधनकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १ एप्रिल, २०१९ पूर्वीच्या वाहनांना पाटी बसविण्यासाठी ३० जून, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या कालावधीत पाटी न बसविलेल्या वाहनांचे हस्तांतरण, पत्ता बदलणे, कर्जबोजा चढविणे यांसारख्या सेवांवर आधीच निर्बंध लादण्यात आले होते.

## पुण्यात जो आदेश लागू झाला तोच आदेश मुंबईतही लागू; डायरेक्ट १५ दिवसांसाठी जमावबंदी जाहीर

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहे. यापाठोपाठ आता मुंबईतही जमावबंदीचा आदेश लागू करण्यात आला आहे. मुंबईत ६ ऑगस्टपर्यंत जमावबंदी लागू करण्यात आली आहे. दिल्लीत जंतर मंतरवर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी उपोषण सुरु आहे. नीट परीक्षेत झालेल्या गैरप्रकारांविरोधात आंदोलन सुरू आहे. महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी आंदोलनाची तयारी सुरु आहे. याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पोलिसांनी जमावबंदीचे आदेश लागू केले आहेत. मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २३ जुलै २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून ६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. सार्वजनिक शांतता भंग होण्याची, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची तसेच मानवी जीवित व मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेऊन हे आदेश जारी करण्यात आले आहेत. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारच्या मिरवणुकांवर बंदी घालण्यात आली असून मिरवणुकांमध्ये लाऊडस्पीकर, ध्वनिवर्धक, वाद्यवृंद तसेच फटाके फोडण्यासही मनाई करण्यात आली आहे. विवाह समारंभ, अंत्ययात्रा, कंपन्या व सहकारी संस्थांच्या वैधानिक बैठका, चित्रपटगृहे, नाट्यगृहे, शैक्षणिक संस्था, सरकारी कार्यालये, न्यायालये, दुकाने, कारखाने आणि नियमित व्यावसायिक कामकाज यांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे झोनल पोलीस उपायुक्त किंवा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने काही सभा किंवा मिरवणुकांना परवानगी दिली जाऊ शकते. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा मुंबई पोलिसांनी दिला आहे.

## स्वच्छतेच्या कामांची महापौरांकडून अचानक पाहणी

### कर्मचाऱ्यांना काळजी घेण्याच्या सूचना



**लातूर/ प्रतिनिधी:** महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांनी सोमवारी (दि. २० जून ) शहरातील झोन क्रमांक बी मध्ये अचानक भेट देऊन स्वच्छतेच्या कामकाजाची पाहणी केली. पावसाळ्याच्या दिवसात नागरिकांच्या स्वच्छतेबाबत तक्रारी येऊ नयेत, असे निर्देश देतानाच कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

सोमवारी महापौरांनी झोन बी मधील प्रभाग क्रमांक १५,१६,१७ व १८ मध्ये अचानक भेट दिली. या भागात सुरू असलेल्या स्वच्छतेच्या कामांची पाहणी केली. प्रभागात कोठेही पावसाचे पाणी थांबणार नाही,याची काळजी घ्यावी.कचरा साठवून राहू नये तसेच स्वच्छतेबाबत नागरिकांच्या तक्रारी येऊ नयेत याची काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

पावसाळ्याचे दिवस आहेत. स्वच्छतेची कामे करताना कर्मचाऱ्यांनी स्वतःचे आरोग्य सांभाळावे.सुरक्षिततेसाठी महानगरपालिकेच्या वतीने कर्मचाऱ्यांना गमबूट, हॅन्डग्लोव्हज व मास्क देण्यात आले आहेत. त्याचा वापर करावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी क्षेत्रीय अधिकारी रोहित पवार,मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे यांच्यासह सर्व स्वच्छता निरीक्षक व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## महाकवी कालिदास यांच्या जयंतीनिमित्त कविसंमेलन संपन्न



**लातूर/ प्रतिनिधी:** अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती शाखा लातूरच्या वतीने दि.१६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता महाकवी कालिदास जयंतीनिमित्त कवी संमेलन आयोजित करण्यात आलेले होते.कार्यक्रमाची सुरुवात महाकवी कालिदास यांच्या प्रतिमेला अभिवादन करून तुलसीला जल अर्पण करून करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध कथाकार जी. जी.कांबळे तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक रमेश चिल्ले व कवी वात्रटिकाकार भारत सातपुते हे उपस्थित होते. कवी संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध गझलकार शायर सुरेश गीर हे होते.

सदरील कवी संमेलनात अनेक सुप्रसिद्ध कवी उपस्थित होते.त्यामध्ये ग्रामीण कवी नरसिंग इंगळे, प्रकाश घादगीने, मंगला सास्तूरकर, प्रदीप कांबळे, दयानंद बिराजदार, देवदत्त मुंडे,नयन राजमाने, वृषाली पाटील, गोविंद जाधव, विश्वंभर इंगोले, ऋचा पत्की, सुनिता मोरे, सुलक्षणा सोनवणे, डॉ.प्रणिता चाकूरकर इत्यादी कवींनी आपल्या बहारदार कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. बालाजी भंडारे संघटन मंत्री लातूर जिल्हा शाखा यांनी केले तर कवी संमेलनाचे सूत्रसंचालन साहित्य भारती शाखा लातूरचे अध्यक्ष इंजि.शैलजा कारंडे यांनी केले.

## पेपरफुटीप्रकरणी शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारावी; जिजाऊ ब्रिगेडची राजीनाम्याची मागणी

**निलंगा/प्रतिनिधी :** देशभरात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने समोर येत असलेल्या कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला असून, या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी जिजाऊ ब्रिगेड, निलंगा यांच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात तालुकाध्यक्ष सुनिता सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्यामार्फत केंद्र सरकारला निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, वैज्ञानिक, शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक प्रश्नांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन सुरू केले असून, त्या आंदोलनाला जिजाऊ ब्रिगेडने जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.

तसेच, आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीवर परिणाम झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रात पारदर्शक, विश्वासार्ह आणि भ्रष्टाचारमुक्त परीक्षा प्रणाली निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत, तसेच पेपरफुटीच्या घटनांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, दिल्लीतील आंदोलनकर्त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करण्यात आली असून, केंद्र सरकारने या आंदोलनाची तातडीने दखल घेऊन संवादाद्वारे प्रश्न मार्गी लावावेत आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम, जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष सुनिता सूर्यवंशी, तालुका उपाध्यक्ष छाया बिरादार, तालुका सचिव रेखा ज्ञानेश्वर तोटाळे, मनीषा बालाजी भोपी, सुलक्षणा तानाजी भोपी, ऐश्वर्या धुमाळ, आशा सरवदे, सविता आर्य, सुलोचना कांबळे, शिवकन्या बिराजदार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## संपादकीय...

### १६ वर्षांनी स्पेनच्या फुटबॉल संघाने जगज्ञेतेपदी आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले

फिफा तथा फुटबॉल विश्र्वचषक स्पर्धेचा महाअंतिम सामना अपेक्षेनुसार अभूतपूर्व जल्लोषात पार पडला आणि क्षणाक्षणाला उत्कंठा वाढवणाऱ्या या सामन्यात अर्जेंटिनाचा पराभव करून १६ वर्षांनी स्पेनच्या फुटबॉल संघाने जगज्जेतेपदी आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले. न्यूजर्सीतील मेटलाईफ स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात मेस्सीचा संघ दुसऱ्यांदा विश्र्वचषक जिंकेल, अशी शक्यता अनेकांनी वर्तवली होती; परंतु स्पेनच्या खेळाडूंनी सर्वांचे अंदाज खोटे ठरवत आपणच 'विश्र्वविजेते' असल्याचे सिद्ध करून दाखवले. यापूर्वी २०१० मध्ये स्पेनने पहिल्यांदा विश्र्वचषक जिंकला होता. चेंडूवरील अखंड नियंत्रण, संयमी पासिंग, प्रतिस्पर्ध्याला चेंडूपासून दूर ठेवण्याची कला आणि योग्य क्षणाची वाट पाहत केलेला अचूक हल्ला, ही त्या संघाची ओळख होती. सोळा वर्षांनंतर याच गुणवैशिष्ट्यांच्या आधारे स्पेनने इतिहास रचला. दोन्हीही विश्र्वचषक स्पर्धांमध्ये स्पेनचा संघ सुरुवातीला पराभूत झाला होता; पण त्यानंतर त्यांनी स्पर्धेवर अशी पकड मिळवली की, अंतिम फेरीपर्यंत त्यांना रोखणे अशक्य ठरले. आणखी एक साम्यस्थळ म्हणजे २०१० आणि २०२६ या दोन्ही स्पर्धांमध्ये स्पेनने बाद फेरीत पोर्तुगालचा १-० असा पराभव केला आणि अंतिम सामन्यातही अतिरिक्त वेळेत १-० ने विजय मिळवत विश्र्वचषकावर नाव कोरले. २०१० मध्ये स्पेनच्या संघातील झावी, आंद्रेस इनिएस्ता, सर्जिओ बुस्केट्स आणि झाबी अलोन्सो यांच्या मध्यफळीमुळे प्रतिस्पर्ध्याला चेंडू मिळणेच कठीण होत असे. स्पेनचा उद्देश आक्रमणापेक्षा सामन्यावर नियंत्रण ठेवणे हा अधिक असे. पासिंगच्या माध्यमातून प्रतिस्पर्ध्याची ऊर्जा संपवून त्यांच्याकडून चूक घडवून आणणे, ही त्यांची रणनीती होती. त्यामुळे त्यांचा खेळ अत्यंत आकर्षक असला तरी तो अनेकदा सावध आणि संयमी वाटे. यंदाही हीच तत्त्वे कायम ठेवत त्यांनी विजयश्री खेचून आणली. अनेक वर्षांच्या अनुभवानंतर आणि युरोपीय स्पर्धांमधील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे स्पेनचा संघ मोठ्या स्पर्धेचा दबाव हाताळण्यात अधिक प्रगल्भ झाला आहे. त्यांचे प्रशिक्षकही खेळाडूंना लवचिक रणनीती वापरण्याचे स्वातंत्र्य देतात. यामुळे कठीण परिस्थितीतही हा संघ निकाल बदलू शकतो. चेंडूवरील अफलातून नियंत्रण हा स्पेनच्या फुटबॉलपटूंच्या खेळाचा कणा आहे. अंतिम सामन्यात रोड्रीने मध्यफळीतील सूत्रे सांभाळली, तर पेड्री, फाबियान रुईझ आणि दानी ओल्मो यांनी विविध भागांतून खेळ उभारला. लामिन यामाल, निको विल्यम्स आणि आलेक्स बायेना यांनी मैदानाच्या रुंदीचा प्रभावी वापर करत प्रतिस्पर्ध्यांच्या बचावफळीवर सतत दबाव निर्माण केला. २०१० च्या संघात डेव्हिड व्हिला याने स्पेनच्या आठपैकी पाच गोल केले होते. यावेळी स्पेनच्या संघात आक्रमणाची जबाबदारी अनेक खेळाडूंमध्ये विभागली गेली होती. त्यामुळे एखाद्या खेळाडूला रोखले तरी स्पेनच्या आक्रमणाची धार कमी होत नव्हती. मिकेल ओयार्झाबालने या सामन्यात पाच गोल केले असले, तरी पेद्रो पोरो, मिकेल मेरिनो, लामिन यामाल, फाबियान रुईझ, फेरान टोरेस आणि इतर खेळाडूंनीही महत्त्वाच्या क्षणी गोल करून विजयात मोलाची भर घातली. निर्धारित ९० मिनिटांत सामना बरोबरीत राहिला. मात्र, अतिरिक्त वेळेत अर्जेंटिनाचा बचाव भेदण्यात स्पेन यशस्वी ठरला आणि १०६ व्या मिनिटाला टॉरेसनं शानदार गोल करत स्पेनच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. उनाय सिमोन, पाउ कुबार्सी, आयमेरिक लापोर्ते, मार्क कुकुरेया आणि पेद्रो पोरो यांच्या बचावफळीला प्रसिद्धी मिळाली नसली तरी त्यांनी अधिक प्रभावी कामगिरी केली. प्रतिस्पर्ध्यांना पुढे येण्यापूर्वीच रोखणे आणि आक्रमणाची दिशा बदलणे या आधुनिक तंत्रामुळे स्पेनने अर्जेंटिनाचे अनेक हल्ले सुरुवातीलाच निष्प्रभ केले. सामन्याच्या परिस्थितीनुसार रणनीती बदलण्याची क्षमता हे त्यांच्या विजयाचे गमक ठरले. या ऐतिहासिक विजयामध्ये गोलरक्षक उनाई सिमॉनची भूमिका निर्णायक ठरली. अनेक कठीण प्रसंगी त्याने अप्रतिम बचाव करत स्पेनच्या विजयाची पायाभरणी केली. पेनल्टीवेळी त्याने ज्या संयमाने आणि चपळाईने चेंडू अडवले त्याला तोड नाही. इटली आणि ब्राझीलनंतर, सलग दोन विश्र्वचषक जिंकणारा तिसरा संघ बनण्याची संधी अर्जेंटिनाला होती. इटलीने १९३४ आणि १९३८ मध्ये, तर ब्राझीलने १९५८ आणि १९६२ चे विश्र्वचषक जिंकले होते. अर्जेंटिनाने २०२२ च्या अंतिम सामन्यात पेनल्टी शूटआऊटमध्ये फ्रान्सला ४-२ ने हरवले होते; पण यावेळी स्पेनच्या आव्हानाचा मुकाबला करण्यात मेस्सीचा संघ कमी पडला. स्पर्धेत आठ गोल केलेल्या मेस्सीची गोल्डन बूट जिंकण्याची संधी हुकली. फ्रान्सच्या किलियन एमबाप्पेने १० गोल करत सोन्याच्या बुटावर आपले नाव कोरले. यंदा स्पर्धेत सहभागी संघांची संख्या ४८ होती. यामुळे जेतेपदाचे आव्हान मोठे होते. सामन्यांची संख्या शंभरीपार गेल्याने चाहत्यांना महिनाभर फुटबॉलची मेजवानी मिळाली. स्पर्धेत एकूण २९७ गोल झाले. आजवरच्या विश्र्वचषकातील ही सर्वोच्च संख्या आहे. याखेरीज यंदा 'व्हिडीओ असिस्टंट रेफरी' प्रणालीचा वापर पहिल्यांदाच झाला. तो अनेकदा वादग्रस्त राहिला असला तरीही खेळाच्या निकालांवर त्याचा मोठा प्रभाव टाकला. अंतिम सामन्यात एंजो फर्नांडीजला रेड कार्ड मिळाल्यामुळे अर्जेंटिनाला १० खेळाडूंसह खेळावे लागले. याचा पूर्ण फायदा स्पेनने उचलला. स्पेनच्या खेळाडूला रोखण्यासाठी फर्नांडीजने अतिशय धोकादायक पद्धतीने टॅकल केले. हे पाऊल नियमांच्या विरोधात आणि खेळाडूच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर होते. मुख्य रेफरींनी या कृत्याची गांभीर्याने दखल घेत फर्नांडीजला तत्काळ 'रेड कार्ड' दाखवून मैदानातून बाहेर काढले. सामन्याच्या निर्णायक वळणावर एका खेळाडूला गमवावे लागल्याने संपूर्ण रणनीती विस्कळीत झाली. शेवटी स्पेन विजेता ठरला. आता २०३० चा फिफा विश्र्वचषक हा अत्यंत खास असणार आहे. कारण, विश्र्वचषकाचे शंभरावे वर्ष असणार आहे. या स्पर्धेचे मुख्य यजमानपद मोरोक्को, पोर्तुगाल आणि स्पेन हे तीन देश संयुक्तपणे भूषवणार आहेत. क्रिकेट, फुटबॉल, बास्केटबॉल यांसारख्या खेळांमधून सांघिकता, समन्वय, एकजूट, राष्ट्रीयत्व आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची अतूट जिद्द यांचे विराट दर्शन घडत असते. आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात या वैशिष्ट्यांना महत्त्वाचे स्थान आहे. खेळाच्या मैदानावरील संघ असो वा युद्धभूमीवरील सैन्य असो किंवा राजकारणात शासन सांभाळणारे सत्ताधारी असोत किंवा विविध आस्थापने वा कॉर्पोरेट कंपन्या असोत; या पाच वैशिष्ट्यांशिवाय यशाची दारे खुली होत नाहीत. हाच या स्पर्धेचा आणि विश्र्वविजयाचा संदेश आहे.

# शैक्षणिक अराजकता आणि नैतिक उत्तरदायित्वाचा अभाव

## संवादाचा अभाव आणि दडपशाहीची संस्कृती
## देशव्यापी जनक्षोभ आणि लोकशाहीची ताकद







कोणत्याही देशाची लोकशाही व्यवस्था किती परिपक्व आणि सुदृढ आहे, हे केवळ तेथील निवडणुका किंवा कायदेमंडळातील चर्चेवरून ठरत नाही; तर त्या देशातील तरुण पिढीला आपले प्रश्न मोकळेपणाने मांडण्याचा अधिकार किती मिळतो आणि शासन त्यांच्या आवाजाला किती गांभीर्याने ऐकते, यावर ठरते. दिल्लीतील जंतरमंतर ते संसद भवनापर्यंत उसळलेला हा विद्यार्थ्यांचा रोष, शिक्षण व्यवस्थेतील अनागोंदी कारभार, पेपरफुटीचे सत्र आणि त्यावर प्रशासनाकडून झालेली जाणीवपूर्वक दडपशाही या सर्व घडामोडींनी भारतीय लोकशाहीच्या सध्याच्या कार्यपद्धतीवर आणि सामाजिक न्यायावर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहेत.

देशाच्या शिक्षण प्रणालीवर आज अविश्वासाचे काळे ढग दाटले आहेत. केंद्रीय पातळी असो वा विविध राज्यांमधील परीक्षा असोत, सातत्याने होणारी पेपरफुटी ही आता केवळ प्रशासकीय त्रुटी राहिलेली नसून ती लाखो होतकरू विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारी एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. वर्षानुवर्षे दिवस-रात्र एक करून अभ्यास करणाऱ्या मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील मुलांचे स्वप्न जेव्हा अशा गैरव्यवहारांमुळे क्षणात धुळीस मिळते, तेव्हा त्यांच्या मनात निर्माण होणारा रोष स्वाभाविक असतो. अशा राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संकटाची नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ पावले उचलणे अपेक्षित असताना, शिक्षण क्षेत्राच्या सर्वोच्च पदांवर बसलेल्या व्यक्तींनी याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यास हलके लेखणे हे प्रशासकीय असंवेदनशीलतेचे टोक आहे. जेव्हा शासनकर्ते जनक्षोभाकडे पाठ फिरवतात, तेव्हा तो रोष रस्त्यावर उतरल्याशिवाय राहत नाही, हा इतिहास आहे.

लोकशाहीत असंतोष व्यक्त करणे हा प्रत्येक नागरिकाचा संविधानिक अधिकार आहे. पर्यावरणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांच्यासारख्या व्यासंगी व्यक्तीने जेव्हा विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी उपोषणाचा मार्ग पत्करला आणि शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी अत्यंत निकोप व लोकशाहीला साजेसा संवाद साधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा प्रशासनाने चर्चेचे दरवाजे बंद करून विद्यार्थी आंदोलकांवर निष्ठुरतेने बळाचा वापर करणे पसंत केले.

आंदोलकांना समजून घेण्याऐवजी, त्यांच्या मागण्यांवर विचार करण्याऐवजी थेट अश्रुधुराच्या नळकांड्या फोडणे आणि लाठीचार्ज करणे ही लोकशाही संस्कृतीची विटंबना आहे. जंतरमंतरवर किंवा संसदेच्या परिसरात हातात कोणतीही हिंसाचाराची साधनं नसलेल्या शांततापूर्ण आंदोलकांवर असा बडगा उगारणे हे सुसंस्कृत राजकारणाचे लक्षण नव्हे. सुरुवातीच्या टप्प्यात या संघर्षाला कोणताही मोठा राजकीय पाठिंबा नव्हता...!

हा पूर्णपणे विद्यार्थ्यांचा आणि तरुणांचा स्वयंभू लढा होता. परंतु, जेव्हा प्रशासनाने दडपशाहीचा अतिरेक केला, तेव्हा या चळवळीने देशव्यापी स्वरूप धारण केले. महाराष्ट्रासह देशाच्या विविध प्रांतांतून शैक्षणिक धोरणात होरपळलेल्या वैफल्यग्रस्त बेरोजगार तरुणांचा विद्यार्थ्यांचा या आंदोलनाला मिळालेला सक्रिय पाठिंबा हे स्पष्टपणे दर्शवतो की हा प्रश्न आता एका विशिष्ट राज्याचा किंवा घटकाचा राहिलेला नाही, तर तो देशाच्या प्रत्येक कुटुंबाशी आणि युवा पिढीशी जोडलेला ज्वलंत सामाजिक प्रश्न बनला आहे.



या प्रखर जनआंदोलनापुढे अखेर संसदेचे कामकाजही स्थगित करावे लागणे आणि शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची शक्यता निर्माण होणे, हे दर्शवते की सत्तेच्या मस्तीपेक्षा जनशक्तीची ताकद ही नेहमीच सर्वोच्च असते. जंतरमंतरवर आणि संसदेच्या परिसरात चालवलेल्या लाठीने केवळ काही तरुणांच्या शरीराला वेदना दिलेल्या नाहीत, तर ती आपल्या लोकशाहीच्या सहिष्णुतेवर आणि संवादाच्या, समन्वयाच्या संस्कृतीवर झालेला मोठा आघात आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे रक्षण करणे, परीक्षा प्रणाली पूर्णपणे पारदर्शक बनवणे आणि तरुणांच्या आवाजाचा आदर करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. सत्तेच्या किंवा खाकी वर्दीच्या जोरावर लोकांचा आवाज कधीही दीर्घकाळ दाबला जाऊ शकत नाही. शासनाने दडपशाहीचा अहंकार बाजूला सारून संवादाचा मार्ग स्वीकारणे आणि शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा घडवून आणणे, हीच आजच्या लोकशाहीची खरी आणि अपरिहार्य कसोटी आहे.

**मा.ना.झेंपलवाड यादव**
**स्तंभ लेखक / राजकीय विश्लेषक**
**९०११४११४९२**

# दिल्ली पेटली, विद्यार्थी रस्त्यावर; सरकार अजूनही शांत?

## विद्यार्थ्यांचा आक्रोश, दिल्लीतील आंदोलन
## आणि शासनाच्या उत्तरदायित्वाची खरी वेळ








देशाच्या भवितव्याचा पाया जर शिक्षण असेल, तर त्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा राष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा असतो. पण जेव्हा स्पर्धा परीक्षांचे प्रश्नपत्रिकाच पैशाच्या जोरावर बाजारात विकले जातात, तेव्हा केवळ एखादी परीक्षा भ्रष्ट होत नाही, तर लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने, पालकांचा विश्वास आणि देशाच्या भविष्यावरील आशाही हादरते. नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरात निर्माण झालेला संताप हा केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित राहिलेला नाही. तर तो आज संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा राष्ट्रीय विषय बनला आहे. हजारो विद्यार्थी दिल्लीतील जंतर-मंतरवर उतरले आहेत. त्यांच्या मागण्या राजकीय नसून, उत्तरदायित्व, न्याय आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, एवढ्याच आहेत.

या आंदोलनाला नवे स्वरूप मिळाले ते प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. २८ जून पासून त्यांनी उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेल्यानंतर न्यायालयाच्या निर्देशांनुसार त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र आंदोलन थांबले नाही. उलट त्याची नैतिक ताकद अधिक वाढली. त्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषणाची धुरा स्वीकारली असून, २० जुलै रोजी संसदेकडे ''चलो संसद'' मोर्चाची घोषणा कायम असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. लोकशाहीत आंदोलन हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. शासनाला विरोध करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट शासनाचे लक्ष जनतेच्या प्रश्नांकडे वेधण्याचा तो लोकशाही मार्ग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे ही लोकशाहीची खरी कसोटी असते.

आज देशातील लाखो विद्यार्थी एका प्रश्नाचे उत्तर शोधत आहेत. जर मेहनत, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता यांना प्रश्नपत्रिका माफियांसमोर पराभूत व्हावे लागणार असेल, तर अभ्यास करण्याचा अर्थ काय? हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. कारण एका विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाणे म्हणजे केवळ त्याचे वैयक्तिक नुकसान नसते, तर त्या कुटुंबाच्या आर्थिक, मानसिक आणि सामाजिक आयुष्यावर त्याचे दूरगामी परिणाम होतात. या आंदोलनाला विविध विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला आहे. राहुल गांधी, उद्धव ठाकरे, चंद्रशेखर आझाद यांच्यासह अनेक नेत्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने संवाद साधावा, अशी भूमिका घेतली आहे. मात्र कोणत्याही आंदोलनाला राजकीय पाठिंबा मिळाला म्हणून त्या आंदोलनातील मूळ प्रश्न गौण होत नाही. उलट शासनाने त्या प्रश्नाचा अधिक गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण होते.

सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावत असतानाही त्यांनी आंदोलन मागे घेतले नाही. रुग्णालयातूनही त्यांनी २० जुलैच्या संसद मोर्चासाठी नागरिकांना शांततापूर्ण सहभागाचे आवाहन केले आहे. त्यांचे हे आवाहन अनेकांसाठी नैतिक प्रेरणेचे प्रतीक ठरले आहे. तथापि, या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावी लागेल. कोणत्याही तपासाआधी दोषारोप करणे योग्य नाही. दोषींवर कठोर कारवाई व्हावी, ही विद्यार्थ्यांची अपेक्षा रास्त आहे. पण ती कारवाई कायद्याच्या चौकटीत, निष्पक्ष तपासानंतरच व्हावी, ही लोकशाहीची मूलभूत अट आहे. सरकारवर उत्तरदायित्व आहे, तसेच तपास यंत्रणांवर निष्पक्षतेची जबाबदारीही तितकीच आहे.

आज विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा सर्वात मोठा धोका आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजे गुणवत्तेची स्पर्धा राहिली नाही, तर पैशांची स्पर्धा झाली, अशी भावना समाजात निर्माण झाली तर देशाची गुणवत्ता आधारित व्यवस्था कोलमडू शकते. उद्याचे डॉक्टर, अभियंते, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी आणि न्यायाधीश हेच विद्यार्थी आहेत. त्यांचा आत्मविश्वास ढासळणे म्हणजे देशाच्या भविष्याची पायाभरणी कमकुवत होणे होय. सरकारने या आंदोलनाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नाप्रमाणे न पाहता, राष्ट्रीय शिक्षणव्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. दोषींना कठोर शिक्षा, परीक्षा प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पेपरफुटी रोखण्यासाठी स्वतंत्र आणि पारदर्शक यंत्रणा, तसेच विद्यार्थ्यांशी थेट संवाद, ही चार पावले तातडीने उचलली गेली तर परिस्थिती बदलू शकते.



लोकशाहीत सरकारची ताकद विरोध दडपण्यात नसते, तर विरोध ऐकून त्यावर उत्तर देण्यात असते. संसद हे जनतेच्या प्रश्नांचे मंदिर मानले जाते. त्यामुळे २० जुलैचा प्रस्तावित संसद मोर्चा केवळ आंदोलन नसून, शासन आणि विद्यार्थ्यांमधील विश्वासाची परीक्षा ठरणार आहे. आज देशातील प्रत्येक पालक, प्रत्येक विद्यार्थी आणि प्रत्येक जागरूक नागरिक एका उत्तराची वाट पाहत आहे. या देशात प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित आहे का? या प्रश्नाचे उत्तर घोषणांमध्ये नाही, तर कृतीत दडलेले आहे. कारण प्रश्नपत्रिका फुटली की फक्त एक परीक्षा रद्द होत नाही, तर न्याय, समान संधी आणि संविधानातील समानतेच्या तत्त्वावरही प्रश्नचिन्ह उभे राहते. देशाला आंदोलन नको आहे, देशाला विश्वास हवा आहे. विद्यार्थ्यांना संघर्ष नको आहे, त्यांना न्याय हवा आहे आणि शासनानेही हे लक्षात ठेवले पाहिजे की, राष्ट्राची खरी उभारणी संसदेच्या भिंतींवर नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनातील विश्वासावर उभी असते.

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आम्ही लातूरकरांचे लक्षवेधी धरणे आंदोलन



**लातूर/प्रतिनिधी :** नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा म्हणून लोकशाही मार्गाने आंदोलन करणारे पर्यावरण शास्त्रज्ञ सोमन वांगचूक आणिकॉक्रोच जनता पार्टीचे अभिजित दिपके व सहकाऱ्यांनी चालविलेल्या बेमुदत उपोषण आंदोलनाची दखल न घेता उलट सोनम वांगचूक यांना चुकीच्या पध्दतीने दवाखान्यात दाखल केल्याच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या संसद मार्चला समर्थन देण्यासाठी आम्ही लातूरकरांनी आज गांधी चौकात लोकशाही वाचवा,संविधान वाचवा,नागरिकांचे हक्क जपा,असे नारे देत, केंद्र सरकारचा जोरदार निषेध करत लक्षवेधी धरणे आंदोलन केले.

दिल्लीच्या जंतरमंतरवर सीजेपीच्या नेतृत्वात अभिजित दिपकेसह शेकडो युवक-युवती हे बेमुदत धरणे,उपोषण आंदोलन आणि पर्यावरण शास्त्रज्ञ सोनम वांगचूक हे वीस दिवसांपासून आमरण उपोषण करत होते,तथापि दि.१८जुलैला पहाटेच सोनम वांगणूक यांना पोलिसी बळाच्या जोरावर चुकीच्या पध्दतीने उचलून दवाखान्यात दाखल करण्यात आले.त्यावर वांगचूक यांनी कुठलाही उपचार न घेता शिक्षण मंत्री प्रधान यांचा राजीनामा घ्यावा,नीट पेपर फुटीची जबाबदारी शासनाने घेवून उचित कारवाई करावी त्यासाठी दि.२० जुलै रोजी संसदेवर मार्च काढण्यात येईल यात देशवासीयांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले होते,त्याला प्रतिसाद म्हणून सोनम वांगचूक यांच्या उपोषणार पोलीसी बळत्तचा वापर करुन दडपशाहीच्या मार्गाने कारवाई केल्याचा जाहीर निषेध करुन,लोकशाही मूल्यांना धक्का पोहोचविणाऱ्या धोरणांची जबाबदारी घेवून प्रधानमंत्र्यांनी राजीनामा द्यावा,केंद्रीय शिक्षण मंत्री प्रधान यांना तात्काळ बडतर्फ करावे आदी मागण्या घेवून,आज सोमवार,दि.२० जुलै रोजी आम्ही लातूरकरांनी एकत्र येत गांधी चौकात लक्षवेधी धरणे आंदोलनाचे आयोजन केले होते.यात स्थरातील नागरिक सहभागी झाले होते.


आज चुकीच्या पध्दतीच्या लोकांच्या हातात देशाचा कारभार गेल्याने देशाचे संविधान,लोकशाही धोक्यात आली आहे,अशावेळी लोकशाही मार्गाने आंदोलन करणे हा जीवंत लोकशांहीचा आत्मा असून, आंदोलनामुळेच लोकशाही सशक्त होवू शकते,तरुणांसह,सर्वच स्थरातील लोकांनी मोठ्या उत्साहाने यात सहभाग याबद्दल ज्येष्ठ विचारवंत डॉ.नागोराव कुंभार यांनी सर्वांचे कौतुक केले.

याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विनायकराव पाटील कवठेकर यांनी या आंदोलनाचा पुढचा भाग म्हणून लातूरमध्ये वारकरी फेरी काढावी अशी सूचना केली. अनिंसचे प्रमुख माधव बावगे,ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी, बाळ होळीकर डॉ.गोदाम,डॉ.सूर्यवंशी, सुपर्ण जगताप,ॲड.राधाकृष्ण देशमुख,इंजि. नगरसेवक सचिन गायकवाड,रमेश चिल्ले,............आदींनी नीट पेपर फुटीसह मोदींच्या नेतृत्वाखाली सर्वच क्षेत्रात चाललेल्या अनागोंदी कारभारावर सडकून टिका करुन प्रधामंत्री नरेंद्र मोदी, शिक्षण मंत्री धमेंद्र प्रधान यांच्या राजीनाच्याची मागणी केली.

यावेळी भारत माता की जय,आरएसएस मुर्दाबाद,मोदी तेरी तानाशाही नही चलगे, मोदी सरकार हायहाय, फडणवीस सरकार हाय हाय,अभिजित दिपके,सोमन वांगचूक तुम संषर्घ करो,हम तुम्हारे साथ है,हम सब एक है अशा गगनभेदी घोषणा देवून आंदोलनकांनी परिसर दणाणून सोडला. या आंदोलनाचे सूत्रसंचालन ॲड.भाई उदय गवारे यांनी केले.

या आंदोलनात ॲड.संभाजीराव पाटील,सामाजिक कार्यकर्ते रामकुमार रायवाडीकर, मिलिंद कांबळे, संजय व्यवहारे, गणपतराव तेलंगे,राजकुमार होळीकर, प्रा.अर्जून जाधव,डॉ.बी.आर. जाधव,कॉ.विश्वंभर भोसले,इंजि.शफि शेख, डॉ.गणेश गोमारे, जमीलनाना शेख,बी.बी.गायकवाड,उमाकांत धावारे,मोहसीन खान,प्रताप भोसले,शाम वरयानी,अनिल दरेकर,ॲड.दिलीप कांबळे, उत्तरेश्वर बिरादार,प्रा.दत्ता सोमवंशी, ॲड.प्रणील नागूरे, दिपक गंगणे,बाबासाहेब बनसोडे, डॉ.अक्षय मुंडे, रुक्साना मुल्ला,सुमती जगताप, लता ग गायकवाड, प्रियंका धनेगावे,प्रजापती कवठेकर,प्रगती कवठेकर, पांडुरंग देडे,प्रगती डोंगरे, अनिल मुदगडे, संगीता शहरकर, रंजना चव्हाण, रंजना हसूरे, शोभा पाटील, लता बाबणे,मीरा देशमुख,राम कोरडे, रणधीर सुरवसे,साधू गायकवाड, यांच्यासह महिला तरुण, विद्यार्थी, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थी सहभागी झाले होते.राष्ट्रगीताने या लक्षवेधी धरणे आंदोलनाची सांगता करण्यात आली.

## सिने स्टिल टीव्ही अँड मोशन फोटोग्राफर्स असोसिएशनच्या सदस्यांच्या पाल्यांना समाजसेवक, निर्माते आणि पत्रकार के. रवि (दादा) यांच्या हस्ते मोफत नोटबुकचे वाटप





**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील बॉलीवूडच्या प्रसिद्ध सिने स्टिल टीव्ही अँड मोशन फोटोग्राफर्स असोसिएशनतर्फे दरवर्षीप्रमाणे याही २०२६ वर्षी समाजसेवक, निर्माते आणि पत्रकार के. रवि ( दादा) यांच्या एक लिया मीडिया लिंक एंड इवेंटस मैनेजमेंट च्या पुढाकाराने असोसिएशनच्या सदस्यांच्या पाल्यांना मोफत नोटबुकचे वाटप करण्यात आले.

ही संस्था दरवर्षी आपल्या फोटोग्राफर सदस्यांच्या मुलांसाठी मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करते. २०२६ या वर्षातही संस्थेने आपले मानद आजीवन सदस्य के. रवि ( दादा ) यांच्या सौजन्याने संस्थेच्या कार्यालयात फोटोग्राफर सदस्यांच्या मुलांसाठी नोटबुक वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या उपक्रमाबद्दल संस्थेचे सरचिटणीस . अतुल राजकुले आणि अध्यक्ष जनाब . अप्पी वारसी यांनी संपूर्ण समितीच्या वतीने श्री. के. रवि (दादा) यांचे मनापासून आभार मानले.

के. रवि ( दादा ) यांचे सामाजिक कार्यांमधील योगदान अनेक वर्षांपासून सुरू आहे. बॉलीवूड क्षेत्रासाठीही ते सातत्याने मदत करत असतात. त्यांचे हे मोफत नोटबुक वाटप कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, त्याबद्दल असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी त्यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.

## डॉ.वसुदेव (बप्पा) गायकवाड यांचा कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ग्रंथालय व्यवस्थापण कार्यशाळा, मुंबई येथे सक्रीय सहभाग

**केज/प्रतिनिधी :** दिनांक १८ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ ते रात्री ६ या वेळात कृत्रिम बुद्धिमत्ता () आणि ग्रंथालय व्यवस्थापण कार्यशाळा, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई येथे घेण्यात आली. या कार्यशाळेत स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीड चे संस्थापक अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, सुप्रसिद्ध वक्ते डॉ. वसुदेव (बप्पा) गायकवाड यांनी सक्रीय सहभाग घेतला. हि कार्यशाळ सार्वजनिक ग्रंथालये, शालेय ग्रंथालये, महविद्यालयीन ग्रंथालये व इतरही ग्रंथालयातील ग्रंथपाल/ पदाधिकारी यांच्यासाठी घेण्यात आली. या कायशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुंबई विद्यापीठाच्या डॉ. प्रतिभा गोखले यांची उपस्थिती होती. नव्या युगातील परिवर्तनाची दिशा दिनांक १८ जुलै २० २ ६ रोजी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ग्रंथालय व्यवस्थापण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत ५ ६ ग्रंथपाल/ ग्रंथालय पदाधिकारी यांचा सहभाग होता. राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी नवीन ग्रंथालयापुढील आव्हाणे स्विकारून च्या माध्यमातून ग्रंथालयाचे रुपडे पालटायला ग्रंथपाल व संचालक मंडळाने पुढाकार घ्यावा असे अवाहन केले. १)ग्रंथालय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्व या विषयावर डॉ. संदीप भावसार यांनी सखोल मार्गदर्शन केले. २ ) ग्रंथालय सेवामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर याविषयी चेतन टाकसाळे यांनी मार्गदर्शन केले. ३ ) ग्रंथालयातील डिजिटल सेवा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयी प्रल्हाद जाधव यांनी मांडणी केली. ४) ग्रंथालय आणि कृत्रिम बुद्धिमत्ता( ) ऑडिओ, व्हिडिओ आणि व्हिज्युअल बुक्स याविषयी मयुर कुलकर्णी यांनी मांडणी केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासकेंद्र ग्रंथालयाच्या दालनात हि कार्यशाळा घेण्यात आली. सहभागी प्रतिनिधिंना प्रमाणपत्र वितरण प्र. ग्रंथालय उपसंचालक शशीकांत काकड व सेवानिवृत्त सहाय्यक ग्रंथल्य संचालक डॉ. राजशेखर बालेकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्र. ग्रंथालय संचालक शशिकांत काकड यांनी मार्गदर्शन केले. सर्व प्रतिनिधींच्या वतीने डॉ. वसुदेव( बप्पा ) गायकवाड यांनी प्रातिनिधीक स्वरूपात मनोगत व्यक्त करून ग्रंथालयातील पुढील आव्हाने, समस्या, उपाययोजना, निधीची कमतरता व तज्ञ आणि प्रशिक्षित कर्मचा-यांची वाणवा या विषयी मत व्यक्त करून सर्वांनी आव्हानाला सामोरे जाण्याचे अवाहन करून कार्यशाळा आयोजकांचे व मार्ग दर्शकांचेही कौतुक केले. कार्यशाळेचे नियोजन व प्रासाविक ग्रंथपाल नवेले यांनी केले. व कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.

## गणेशोत्सव राज्य महोत्सवांतर्गत मंडळांसाठी कार्यशाळेचे २३ जुलै रोजी आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला महाराष्ट्र शासनाने मागील वर्षीपासून 'राज्य महोत्सवा'चा दर्जा दिला आहे. यावर्षी या राज्य महोत्सवांतर्गत होणाऱ्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेचा विस्तार देश पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या विस्तारामुळे, राज्यासोबतच देशभरात व जगभरात विविध ठिकाणी जी सार्वजनिक मंडळे गणेशोत्सव अत्यंत उत्साहाने व विधायक उपक्रमांद्वारे साजरे करतात त्यांना देखील स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

## शिवा इंगोले यांची कविता बाबुराव बागूलांच्या प्रतिभेशी नाते सांगणारी – डॉ. भालचंद्र मुणगेकर



**मुंबई/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटर्स असोसिएशनच्या वतीने क्रांतिकारी लेखक बाबुराव बागूल यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ आंबेडकरी कवी शिवा इंगोले यांच्या अक्षराचा तिसरा डोळा या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा दादर येथील सुरेंद्र गावस्कर सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. मुणगेकर म्हणाले, शिवा इंगोले यांनी आपल्या कवितेत पौराणिक संदर्भांचा अत्यंत समर्पक वापर केला आहे.

त्यांची कविता क्रांतिकारी लेखक बाबुराव बागूल यांच्या साहित्यप्रतिभेशी नाते सांगणारी आहे. बाबुराव बागूल यांचे समग्र वाङ्मय प्रकाशित करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळासह पुढाकार घेण्यास आम्ही तयारआहोत.‘‘ कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी न्यायाधीश डी. के. सोणवणे, समीक्षक प्रा. डॉ. अनिल सपकाळ, प्रा. रामप्रसाद तौर आणि प्रा. कुसुम त्रिपाठी उपस्थित होते.

प्रा. डॉ. अनिल सपकाळ यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शिवा इंगोले यांची कविता संस्कृतीला प्रश्न विचारणारी, समाजाच्या नवनिर्मितीचा ध्यास घेणारी आणि चिंतनगर्भ तत्त्वज्ञान व्यक्त करणारी महत्त्वपूर्ण काव्यनिर्मिती आहे.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बाबुराव बागूल यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तसेच दिवंगत ज्येष्ठ समाजवादी विचारवंत कुमार सप्तर्षी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रास्ताविकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटर्स असोसिएशनचे सचिव नाना आहिरे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला.मनोगत व्यक्त करताना कवी शिवा इंगोले म्हणाले, बाबुराव बागूल अर्थात आबा यांच्याशी संवाद साधताना दहा ग्रंथ वाचल्याचे समाधान मिळत असे. त्यांनीच मला लिहिण्याची प्रेरणा दिली, हातात लेखणी दिली, शब्द दिले आणि जगाकडे पाहण्याची दृष्टी दिली.

या प्रसंगी कवी शिवा इंगोले यांच्या पत्नी उषा इंगोले यांचा डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. माजी न्यायाधीश डी. के. सोणवणे आणि प्रा. कुसुम त्रिपाठी यांनीही शिवा इंगोले यांच्या काव्यप्रतिभेचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कवी सुधाकर सरवदे यांनी केले.

यावेळी गझलकार भागवत बनसोडे, पत्रकार गुणाजी काजिर्डेकर, विश्वनाथ बोरकर, कॉ. सुबोध मोरे, लेखक गजानन अलोने, शिल्पकार वनदेव अठोर, श्रीकृष्ण ठोंबरे, प्रा. डॉ. बहिरव, आण्णा त्रिभुवन, मोहन वाघमारे, सुनील ओवाळ, डॉ. महादेव कांबळे, सुरेखा पैठणे, अविनाश कदम, भटू जगदेव, राजरत्न राजगुरू, मधू कांबळे, कॉ. दीपक पवार, भास्कर बोराळे, मंगेश बनसोडे, कवी काळखेर, चंद्रमणी तांबे, सूर्यकांत खरात, अमोल निकाळजे यांच्यासह अनेक साहित्यिक, कवी, लेखक व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रदीप नाईक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## लातूर जिल्ह्यात २२ जुलैपासून विधानसभा मतदारसंघनिहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये २२ जुलै, २०२६ पासून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत. याबाबतच्या तारखा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत.



या शिबीराच्या माध्यमातून नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारी स्वीकारणे, विविध प्रमाणपत्रे वाटप करणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनेतंर्गत लाभ मंजूर करणे, ई-केवायसी करणे, नवीन व दुय्यम डिजिटल शिधापत्रिका देणे, पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड करणे, फार्मर आयडी देणे, डिजिटल सातबारा वाटप करणे, विमुक्त भटक्या जाती-जमातींसाठी प्रमाणपत्रे वाटप करणे, आभा कार्ड वाटप करणे, मोजणी विषयक अर्ज स्वीकारणे व मोजणी शीट (क-प्रत) वाटप करणे तसेच आधार कार्ड दुरुस्ती व अद्ययावत करणे यांसारख्या विविध सेवा पुरवल्या जाणार आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांच्या म्हणजेच आरोग्य, कृषी, जिल्हा परिषद, भूमी अभिलेख आणि नगरपालिका प्रशासन विभागाच्या योजनांचे लाभ व सेवा हक्क कायद्यानुसार दिल्या जाणाऱ्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात २२ जुलै, २०२६ रोजी रेणापूर येथील रेणुकाई मंगल कार्यालय येथे; उदगीर विधानसभा मतदारसंघात २२ जुलै, २०२६ रोजी उदगीर तालुक्यातील लोहारा शिवशंकर मंगल कार्यालय येथे; निलंगा विधानसभा मतदारसंघात २२ जुलै, २०२६ रोजी निलंगा येथील केतकी मंगल कार्यालय येथे; औसा विधानसभा मतदारसंघात २२ जुलै, २०२६ रोजी किल्लारी येथे; लातूर शहर विधानसभा मतदारसंघात २४ जुलै, २०२६ रोजी लातूर येथील पार्वती मंगल कार्यालय येथे आणि अहमदपूर विधानसभा मतदारसंघात ३१ जुलै, २०२६ रोजी अहमदपूर येथील सावता माळी मंगल कार्यालय येथे शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सर्व शिबीरांचा जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

# डॉ. विश्वासराव आरोटे व निलेश सोमानी यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार हिताचे १३ महत्त्वपूर्ण ठराव मंजूर

## ‘लाडका पत्रकार’ योजनेसह पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी अकोला अधिवेशनात बुलंद आवाज

**अकोला/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवत डॉ. विश्वासराव आरोटे आणि निलेश सोमानी यांच्या नेतृत्वाखाली अकोला येथे झालेल्या पत्रकारांच्या राज्यस्तरीय अधिवेशनात पत्रकार हिताचे तब्बल १३ महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. पत्रकारांच्या कल्याणासाठी, संरक्षणासाठी आणि सामाजिक सुरक्षिततेसाठी हे अधिवेशन ऐतिहासिक ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. अधिवेशनात पत्रकारांच्या आर्थिक, सामाजिक आणि व्यावसायिक प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली.





विशेषतः लाडका पत्रकार योजना राज्य शासनाने तातडीने लागू करावी, हा ठराव डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मांडला. या ठरावाला निलेश सोमानी यांनी अनुमोदन देत जोरदार पाठिंबा दर्शविला. उपस्थित प्रतिनिधींनी हा ठराव एकमताने मंजूर केला. याशिवाय पत्रकारांसाठी आरोग्य विमा, अपघात विमा, निवृत्ती वेतन, पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, अधिस्वीकृती पत्रिकेच्या नियमांमध्ये सुलभता, पत्रकार कल्याण निधी वाढविणे, पत्रकारांना शासकीय योजनांचा लाभ देणे, गृहनिर्माण योजना, प्रशिक्षण सुविधा आणि पत्रकारांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना यासंदर्भातील विविध ठरावही मंजूर करण्यात आले.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्यांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षितता मिळणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट केले. शासनाने पत्रकारांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून मंजूर ठरावांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

निलेश सोमानी यांनी पत्रकारांवरील वाढते हल्ले, खोटे गुन्हे दाखल करण्याच्या घटना आणि पत्रकारांच्या असुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली. पत्रकारांना निर्भय वातावरणात काम करता यावे यासाठी शासनाने ठोस धोरण जाहीर करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिवेशनात राज्यभरातून आलेल्या पत्रकार प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत पत्रकारांच्या प्रश्नांवर एकमुखी भूमिका मांडली. सर्व ठराव टाळ्यांच्या गजरात मंजूर करण्यात आले.

पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी हे अधिवेशन मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास उपस्थित प्रतिनिधींनी व्यक्त केला. शासनाने या १३ ठरावांची तातडीने अंमलबजावणी करून पत्रकारांच्या अपेक्षांना न्याय द्यावा, अशी एकमुखी मागणी अधिवेशनातून करण्यात आली.

# राष्ट्रीय शिक्षण धोरण आराखड्याचा अध्यापन कार्यभार व विद्यार्थी संख्या निकषाचा स्वयंस्पष्ट शासन निर्णय प्रसिद्ध करा

## सहविचार सभेत प्राध्यापकांची एकमुखी मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी, आव्हाने आणि उपाय या विषयावर स्वामुक्टा प्राध्यापक संघटनेच्या लातूर जिल्हा कार्यकारिणीच्यावतीने नुकतीच दयानंद कला महाविद्यालयात जिल्ह्यातील महाविद्यालयीन प्राध्यापकांची सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती.

या सभेमध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय शिक्षण धोरण आराखड्याचा अध्यापन कार्यभार, प्रवेशित विद्यार्थी संख्या निकष व पद मान्यतेचा स्वयंस्पष्ट शासन निर्णय उच्च शिक्षण विभागाने प्रसिद्ध करावा अशी एकमुखी मागणी सर्व प्राध्यापकांच्या वतीने करण्यात आली.

या सहविचार सभेला डॉ.डी.एन.मोरे (उपाध्यक्ष, स्वामुक्टा तथा सदस्य, व्यवस्थापन परिषद, स्वा. रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड), डॉ. विजय भोपाळे (सचिव, स्वामुक्टा तथा अधिसभा सदस्य, स्वा. रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड), डॉ. दिलीप पाईकराव (कोषाध्यक्ष, स्वामुक्टा तथा अधिसभा सदस्य, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड), डॉ. विष्णू पवार (अधिसभा सदस्य, स्वा. रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड), डॉ. महेश बेंबडे (अधिसभा सदस्य, स्वा. रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड) आदी मंडळीनी संबोधित केले.

प्रास्ताविकात बोलताना लातूर जिल्हा कार्यकारिणी सचिव डॉ. अमोल लाटे यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी होत असताना नियमित व तासिका तत्वावरील अध्यापकांच्या समोर जे प्रश्न उभे आहेत ज्यामध्ये विषयाचा अध्यापन कार्यभार गणना करतेवेळी एनइपी मधील सर्व घटकांचा समावेश करणे, प्रचलित प्रवेशित विद्यार्थी संख्या (शहरी व ग्रामीण) निकष यामध्ये कालसुसंगत सुधारणा करणे, पद मान्यता (नियमित व तासिका तत्व) निकष, अध्यापन तासिकांचा अवधी व अध्यापक निहाय कार्यभार निश्चिती अनुषंगाने निर्माण झालेला संभ्रम या प्रमुख बाबींवर लक्ष वेधून घेतले. याप्रसंगी चर्चेत सक्रीय सहभाग घेत प्रातिनिधिक स्वरूपात डॉ. रवी साळुंके, डॉ. आळणे, डॉ.नितीन देशमुख, डॉ. प्रशांत पाटील, डॉ.नरेश पिनमकर, डॉ. मुळजकर, डॉ. माहुरकर, डॉ.पल्लवी पाटील, डॉ.मल्लिकार्जुन वाकडे, डॉ. बालाजी गोरे आदींनी विनाअनुदान, मुक्त व दुरुस्थ शिक्षण पद्धतीमुळे नियमित विद्यार्थी प्रवेश व उपस्थिती वरील झालेला परिणाम, परीक्षा



पद्धती, अभ्यासक्रम आराखड्यातील असमानतेचे निकष, विद्यापीठ समित्यांमध्ये नियुक्तीवेळी संधीची समानता तत्वाचा अभाव, रजेच्या एकरूप परिनियमाची आवश्यकता, सहसंचालक कार्यालय स्तरावरील कामकाजाची कार्यपद्धती याबाबत सविस्तरपणे मांडणी करून विद्यापीठ, सहसंचालक आणि शासन पातळीवर प्राध्यापकांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्याची मागणी करण्यात आली. या अनुषंगाने डॉ.डी.एन.मोरे यांनी सदरील प्रश्नांना घेऊन अभ्यासपूर्ण विवेचन करत प्राध्यापकांच्या शंकांचे निरसन करत राष्ट्रीय शिक्षण धोरण आराखड्याचा अध्यापन कार्यभार, प्रवेशित विद्यार्थी संख्या निकष व पद मान्यतेचा स्वयंस्पष्ट शासन निर्णय उच्च शिक्षण विभागाने प्रसिद्ध करावा यासाठी एमफुकटो संघटनेच्या नेतृत्वात राज्यव्यापी लढा उभा करून अध्यापकांच्या सेवेस कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल याबाबत संघटनेची भूमिका विशद केली. अध्यक्षीय समारोपात संघटनेचे केंद्रीय सचिव तथा अधिसभा सदस्य डॉ. विजय भोपाळे यांनी विस्तृत मांडणी करत संघटनेच्या आजवरच्या कामाचा लेखा जोखा मांडत प्राध्यापकांच्या रजा नियम, पदोन्नती शिबीर, सहसंचालक कार्यालय स्तरावर पद मान्यता निश्चितीवेळी देण्यात येत असलेले निकष, तासिका तत्वावर कार्यरत अध्यापकांच्या पद मान्यता ना-हरकत देण्याची कार्यपद्धती या बाबींची माहिती दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष डॉ.धोंडीबा भुरे यांनी केले तर आभार उपाध्यक्ष डॉ.गोपाळ मोघे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लातूर जिल्हा कार्यकारिणी सदस्य, डॉ. आर. डी. खाकरे, डॉ. रावसाहेब इंगळे, डॉ. पांडुरंग मगर, प्रसिद्धी प्रमुख डॉ. संजय गवई, डॉ. अंकुशकुमार चव्हाण, डॉ. बालाजी घुटे, प्रा. विलास लुटे यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने विजय कुरील आणि संतोष कुरील यांचा विस्तार अधिकारी पदी पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी के मुरळीकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागात कार्यरत असलेले विजय करील आणि संतोष कुरील यांची विस्तार अधिकारी पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला यावेळी मुरळीकर साहेब यांच्या हस्ते दोघांच्याही फेटा शॉल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष रवी कुरील, हिरालाल दिवेकर, धीरज कुरील, राजकुमार चौधरी, धनराज ठाकरे, राजू कुरील, बिसन गोखले, अशोक परदेशी सुनील कुंभेकर, रतन कुरील, प्रभू ठाकरे, कैलास दुर्गे, बजरंग दुर्गे, दर्शन कुरील दिनेश दिवेकर , सुनील ढवळे सह आदी जण उपस्थित होते.

## नालीत अडकलेल्या मुक्या गायीला तरुणांनी दिले जीवनदान



**निलंगा/प्रतिनिधी :** माणुसकी आणि प्राणीप्रेम यांचा सुंदर संगम निलंगा शहरात पाहायला मिळाला. बँक कॉलनी मुख्य रस्त्यालगत सुरू असलेल्या मोठ्या नालीच्या कामात एक निरपराध गाय अडकून पडली होती. बाहेर पडण्यासाठी तिची धडपड सुरू होती, मात्र खोल नालीमुळे ती पूर्णपणे असहाय झाली होती. तिच्या हंबरड्याने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले आणि काही प्राणीप्रेमी तरुण देवदूत बनून तिच्या मदतीला धावून आले.

अभिलाष सोनकांबळे, रवी डांगे, सचिन पवार आणि त्यांच्या मित्रमंडळींनी कोणतीही पर्वा न करता नालीत उतरून अत्यंत शिताफीने बचावकार्य सुरू केले. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता केलेल्या अथक प्रयत्नांनंतर अखेर गायीला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मृत्यूच्या दाढेतून सुटलेल्या त्या मुक्या जीवाला नवजीवन मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

या तरुणांनी कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता केवळ मानवतेच्या भावनेतून केलेले हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जीवनात मुक प्राण्यांच्या वेदना समजून त्यांना मदतीचा हात देणारी अशी माणसे समाजाची खरी ताकद असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, ज्या ठिकाणी नालीचे काम सुरू आहे तेथे पुरेशा सुरक्षा उपाययोजना न केल्यास अशा घटना पुन्हा घडू शकतात. त्यामुळे संबंधित यंत्रणेने बांधकामस्थळी सुरक्षितता, संरक्षक बंधारे आणि इशारा फलक तातडीने उभारावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली.

माणुसकी म्हणजे केवळ माणसांवर प्रेम करणे नव्हे; तर बोलता न येणाऱ्या मुक जीवांचे प्राण वाचविणेही तितकेच मोठे पुण्य आहे, याची प्रचिती या तरुणांनी आपल्या कृतीतून समाजाला करून दिली. त्यांच्या या प्राणीप्रेमाचा आदर्श प्रत्येक नागरिकाने घ्यावा, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## इंग्रजांनाही लाजविणारे क्रूर, निष्ठूर सरकार; दिल्लीतील आंदोलन प्रश्नी रोहित पवार यांची टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करीत होते. शांततेत आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवरही अशाच प्रकारे इंग्रजांकडून लाठीचार्ज केला जात होता. केंद्र सरकार इंग्रजांनाही लाजवेल असे क्रूर, निष्ठूर आहे. शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्था आणि आंदोलकांवर लाठीचार्ज करणाऱ्या हुकूमशाही सरकारचा तीव्र निषेध करतो, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) प्रदेश सरचिटणीस रोहित पवार यांनी केली आहे.

संसदेवर निघालेला विराट मोर्चा सर्वार्थाने चिरडण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे. मात्र, लोकशाहीमध्ये रस्त्यावर उतरलेला सर्वसामान्य माणूस सर्वात शक्तिशाली असतो, हे आज सरकारच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. सोनम वांगचूग यांनी २० दिवस अन्नत्याग केले तरीही शासनाने या आंदोलनाची दखल घेतली नाही.

# नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध होण्यासाठी पायाभूत सुविधा निर्मितीवर भर : सहकार मंत्री

## अहमदपूर येथे महसूल अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारतीचे भूमिपूजन

**लातूर/प्रतिनिधी :** सर्वसामान्य नागरिकांना शिक्षण, आरोग्य, सिंचन, वीज यांसारख्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. याकरिता विविध विकासकामांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांच्या निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असल्याचे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले. अहमदपूर येथे १५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमास अहमदपूरच्या उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, नगराध्यक्ष ॲड. स्वप्नील व्हत्ते, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, कार्यकारी अभियंता सुग्रीव केंद्रे, तहसीलदार उज्वला पांगारकर, उपविभागीय अभियंता सूरज गौंड, दिलीप देशमुख, बाबासाहेब कांबळे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. लवकरच या योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना देण्यास सुरुवात होणार आहे. यासोबतच शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. समाजातील तळागाळातील घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. अहमदपूर मतदारसंघातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज मिळावी,




याकरिता सौरकृषी पंप देण्यात येत असून नवीन विद्युत उपकेंद्र उभारणीस मंजुरी देण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

अहमदपूर शहरात विविध प्रशासकीय इमारतींची उभारणी होत असल्याचे सांगताना सहकार मंत्री श्री. पाटील म्हणाले की, पंचायत समिती व नगरपालिकेच्या माध्यमातून रस्ते विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत. यासोबत निर्माणाधीन इमारतींचे काम गतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. शहरात सहकार भवन उभारण्यासाठी मान्यता मिळाली असून त्याचे कामही लवकरच सुरू होईल. नागरिकांना प्रशासकीय सुविधा देणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी १५ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यातून २० निवासस्थानांचे बांधकाम केले जाणार आहे.

या प्रसंगी नगराध्यक्ष ॲड. स्वप्नील व्हत्ते, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, बाबासाहेब कांबळे व दिलीप देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुग्रीव केंद्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंडळ अधिकारी गोविंद कुंभार यांनी मानले.

## संजय राऊत देशातील तरुणांना भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत; त्यांचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत – बन

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत आणि आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. देशातील तरुण वर्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत असून, तरुणांना भडकवून देशात अस्थिरता निर्माण करण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होणार नाही, असा दावा त्यांनी केला.

मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बन म्हणाले की, दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी न्यायालयाच्या निर्देशांनुसार कारवाई केली आहे. स्टार्टअप, मेक इन इंडिया आणि इतर उपक्रमांमध्ये देशातील तरुण मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने त्यांचा सरकारवरील विश्वास कायम असल्याचे त्यांनी सांगितले. आदित्य ठाकरे यांच्या आंदोलनावर टीका करताना त्यांनी भगव्या विचारांपासून दूर जाण्याचा आरोप केला. हिंदुत्वाच्या भूमिकेवर ठाम राहूनच नेतृत्व करता येते, असेही त्यांनी म्हटले. तसेच उद्धव ठाकरे यांनी रामाच्या नावाने आंदोलन करण्याऐवजी आपल्या पक्षाच्या भवितव्याचा विचार करावा, असा संजय राऊत यांच्यावर टीका करताना नवनाथ बन यांनी ईडी आणि इतर तपास यंत्रणांबाबत केलेल्या वक्तव्यांचा उल्लेख केला.

# केज शहरात वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते शरद धिवार यांचा वाढदिवस साजरा







**केज/प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते आयु.शरद धिवार यांचा वाढदिवस केज शहरात विविध ठिकाणी मित्र परिवाराच्या वतीने साध्या पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. दलित चळवळीमध्ये गेल्या अनेक वर्षापासून शरद धीवार हे संपूर्ण केज तालुक्यामध्ये शोषित, पिडीत,वंचित घटकासाठी काम करत आहेत.शरद धिवार हे केज तालुक्याचे लढवय्या नेतृत्व असुन धडाडीचे कार्यकर्ते व राजगृहाचे कट्टर पाईक म्हणून त्यांची ओळख आहे.

दिनांक २० जुलै २०२६ सोमवार रोजी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते शरद धीवार यांचा वाढदिवस असतो. यावर्षी त्यांनी बॅनरबाजी, डीजे, फटाक्यांची आतषबाजी यावर अनावश्यक खर्च न करता अत्यंत साध्या पद्धतीने त्यांचा वाढदिवस साजरा करण्याचे ठरवल्याने केज शहरात ठीक ठिकाणी मित्र परिवार आणि राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने आयु.शरद धिवार यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

युवा नेते शरद धीवार यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त गटनेते हारूणभाई इनामदार,केजच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.तर पंचायत समिती प्रांगणामध्ये पत्रकार बांधवांच्या वतीने हार,शाल, पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. त्याचबरोबर तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय, शासकीय विश्रामगृह, भीम नगर, क्रांतीनगर, कळंब रोड, शिक्षक कॉलनी यासह शहरातील विविध ठिकाणी लोकप्रतिनिधी व मित्र परिवाराच्या वतीने आयु.शरद धीवार यांचा वाढदिवस साजरा करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पत्रकार बांधवांच्या वतीने वाढदिवस साजरा करताना वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते धनराजजी सोनवणे, सय्यद रज्जाक, ज्येष्ठ पत्रकार महादेव काळे, पत्रकार वसंत सोनवणे, आदर्श क्रांती वार्ताचे संपादक तात्या गवळी, बाबासाहेब गायकवाड यांचेसह अनेक जण उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.